मा. आ. ४५
०८/०३/२०२३

ANNEXURE 'A'
[See Rule 3]
Application for obtaining Information under Right to Information Act 2005

10 रु. COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

To,
The State Public Information Officer,(RTI ACT0 &
Asst./Dy. commissioner, Establishment dept.
Mira-Bhayander mun. corp.
Indira Gandhi Bhavan, Bhayander (w). 401101.

1 Full Name of the Applicant : CHAIN SINGH CHARAN

2. Address of the Applicant : House No. 11, Royal Residence, Rasala Road Paota, Jodhpur - 342 006

3. Particulars of Information required:

Subject matter of Information :
Information pertaining to compliance of provision of (2) & (3) of section 51 of MMC. act 1949. while seeking approval for post of Chief Legal officer & Asst Legal officer

Period to which the Information Relates : Starting from 1/4/2019. Onwards to 27/02/2023.

*Description of Information required:*

① Please furnish me with the photocopies of relevent document containing of "statement setting forth the number, designation and grades of the other officers and servent who should in his opinion maintained, the amount and nature of salaries, fees and allowances which he proposes should be paid to each, as bought before standing committee by commissioner.

② Photocopies of Resolution as passed in standing committee approving and sanctioning such statement in toto or after modifying such statements.

Whether Information is required: By Post or in Person : By Post

In case by Post [Ordinary Registered or Speed Post] : By Speed Post

4. Whether the applicant is below Poverty Line : Negative

Place: Jodhpur
Date: 27/02/2023

(Signature of Applicant)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

माहितीचा अधिकार


**जा.क्र.मनपा/आस्था/मा.अ./ 57 /2022-23** **दि. 14/03 /2023**

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.भा./न.स./आ.क्र.
आवक क्र. ...... 01 ......
दिनांक :- 14/ 3 /2023

प्रति,
जनमाहिती अधिकारी,
नगरसचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत....
Informationpertaining to compliance of provision of (2)(3) of Section 51 of MMC.act 1949 while seeking approval for post of chief legal officer asst. legal officer.

संदर्भ :- श्री.चेन सिंग चरण यांचा दि.27/02/2023 रोजीचा माहिती अधिकार अंतर्गत अर्ज.

महोदय,

विषयांकीत प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, सदर अर्जातील विषय हा आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 6 (3) अन्वये संदर्भिय अर्ज पुढील कार्यवाहीसाठी आपल्या विभागास वर्ग करण्यात येत आहे. तरी संबंधितांस परस्पर माहिती देण्यात यावी व त्याची एक प्रत आस्थापना विभागात देण्यात यावी.

सोबत संदर्भिय पत्र जोडले आहे.

(सुनिल यादव)
जनमाहिती अधिकारी तथा
सहा. आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
श्री. चेन सिंग चरण,
हाऊस नं.11, रॉयल रेसिडेन्सी,
रसाला रोड, पाओटा,
जोधपूर - 342006.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./04 /2023 दिनांक :-26 /03/2023

प्रति,
श्री. चेनसिंग चरण,
हाऊस नं. 11, रॉयल रेसिडेन्सी,
रसाला रोड, पाओटा,
जोधपूर 342006.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
मुख्य विधी अधिकारी व सहाय्यक विधी अधिकारी यांचेबाबत.

संदर्भ :- 1) जनमाहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (सा.प्र.) यांचेकडील जा.क्र.मनपा/आस्था/मा.अ./57/2022-23 दि 14/03/2023 रोजीचे पत्र.
2) आपणांकडील दि. 27/02/2023 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

जनमाहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (सा.प्र.) यांनी संदर्भित पत्र क्र 01 अन्वये आपणांकडील संदर्भित पत्र क्र. 02 ची मुळप्रत या कार्यालयाकडे आपणांस परस्पर माहिती उपलब्ध करुन देणेसाठी वर्ग केलेली आहे.

आपण माहिती अधिकार नियमांतर्गत संदर्भित पत्र क्र. 02 अन्वये दि. 01/04/2019 ते 27/02/2023 पर्यंत विधी अधिकारी व सहा. विधी अधिकारी यांचेविषयी स्थायी समितीमध्ये पारित प्रस्तावांची माहिती मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने सचिव विभागामध्ये उपलब्ध स्यायी समिती सभे संदर्भातील अभिलेख्याची पडताळणी केली असता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 51(2)(3) अंतर्गत मुख्य विधी अधिकारी व सहाय्यक विधी अधिकारी यांचे पदासंबंधी स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव संबंधीत विभागाकडून प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापी दि. 28 ऑगस्ट 2022 रोजी महानगरपालिकेची मुदत संपुष्टात आलेनंतर प्रशासकिय कालावधीमध्ये दि. 14/11/2022 रोजी प्रकरण क्र. 113 अन्वये मुख्य विधी अधिकारी व सहाय्यक विधी अधिकारी यांचे पदासंबंधी ठराव पारित झाल्याचे सचिव विभागाच्या अभिलेखी दिसून येत आहे. सदर ठराव व गोषवाराची साक्षांकित प्रत आपणांस या पत्रासोबत उपलब्ध करुन देत आहोत.

उक्त माहितीकरिता लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 5 पानांकरिता रुपये 10/- (अक्षरी रुपये दहा मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

दि. 20/03/2023 रोजी सदरचे पत्र शिघ्र टपालाने अर्जदारास पाठविले

EM 176601657 IN

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

pc 2U:\01\Pranali\Mahiti Adhikar

आस्थापना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशा/स्था/ क्र. /  9४/ ११/ 2022

(गोषवारा)

993

**विषय :-** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विधी विभागासाठी 01 मुख्य विधी अधिकारी (वर्ग-01) व 02 सहाय्यक विधी अधिकारी (वर्ग-03) या पदांच्या नवीन पदनिर्मिती व महानगरपालिकेच्या मंजूर सेवा नियमात आवश्यक बदल करणेच्या प्रस्तावाबाबत.

शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. सदर आकृतीबंधामध्ये विधी विभागासाठी "मुख्य विधी अधिकारी"- (वर्ग-01) व "सहाय्यक विधी अधिकारी"- (वर्ग-03) हे पद मंजूर नाही. सदर आकृतीबंधामध्ये विधी अधिकारी (वर्ग-02) हे पद मंजूर आहे. सन 2006 साली "विधी अधिकारी" हे पद नामनिर्देशनाने/सरळसेवेने भरलेले आहे. विधी अधिकारी हे पद भरुन 15 वर्षे झालेली आहे. परंतु दि. 26/02/2019 रोजी मंजूर झालेल्या आकृतीबंधामध्ये मुख्य विधी अधिकारी हे पद मंजूर नसल्याने सद्यस्थितीत कार्यरत विधी अधिकारी या पदासाठी पदोन्नतीस कोणतीही संधी उपलब्ध नाही. त्यामुळे 01 मुख्य विधी अधिकारी (वर्ग-01) व 02 सहाय्यक विधी अधिकारी (वर्ग-03) या पदांची आवश्यकता आहे.

दि. 26/02/2019 रोजीच्या शासन निर्णयातील अ.क्र. 6 (3) मध्ये महानगरपालिकेची स्थानिक परिस्थिती व कामाची निकड विचारात घेता, या शासन निर्णयानुसार मंजूर केलेल्या पदांव्यतिरिक्त अधिकची पदे निर्माण करणे आवश्यक आहे, असे महानगरपालिकेचे स्पष्ट मत झाल्यास व महानगरपालिकेचा आस्थापना खर्च विहित टक्केवारीच्या मर्यादेत असल्यास नवीन पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनास सादर करता येईल, असे नमुद आहे.

विधी विभागातील विधी अधिकारी हे एकच पद मंजूर असल्यामुळे विधी अधिकारी यांना सहाय्य करण्याकरीता विधी सहाय्यक हे पद मंजूर होणे आवश्यक आहे. विधी विभागात महानगरपालिकेविरुद्ध मा. न्यायालयात दाखल होणाऱ्या दावे/याचिकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेविरुद्ध एकुण 4000 दावे/याचिका दाखल आहेत. सदर न्यायप्रविष्ठ प्रकरणांमध्ये महानगरपालिका पॅनेलवरील अभियोक्ते तसेच संबंधित विभाग प्रमुख, प्रभाग अधिकारी यांच्याशी समन्वय साधून माहिती उपलब्ध करून देणे तसेच मुदतीत मनपाच्या वतीने लेखी कथन/शपथपत्र दाखल करणे आवश्यक असते. तसेच शहरातील अनधिकृत बांधकामांबाबत दाखल होणाऱ्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांमध्ये महानगरपालिकेच्या बाजूने निर्णय लागणेकरीता बांधकामांस योग्य कायदेशिर नोटीसा देऊन कार्यवाही करणे आवश्यक असते त्याकरीता सर्व प्रभाग अधिकारी यांना विविध नोटीसांचा मसुदा तयार करून द्यावा लागत आहे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगररचना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

त्याकरीता विधी अधिकारी यांना सहाय्य करणेकरीता विधी सहाय्यक असणे आवश्यक आहे. कार्यालयीन कामकाज करीत असताना बहुतांश विभागांना कायदेशिर अडचणी निर्माण होत असतात अशा वेळी विधी विभागाचे कायदेशिर अभिप्राय विभागांमार्फत मागविले जात आहेत. परंतु विधी विभागात कायद्याचे ज्ञान असलेले कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे सर्व प्रकरणांमध्ये स्वत: विधी अधिकारी यांना कायदेशिर बाबींचा सखोल अभ्यास करून वेळेत अभिप्राय द्यावा लागत आहे. त्यामुळे विधी अधिकारी यांच्यावर मोठया प्रमाणात कामाचा व्याप वाढत चालला आहे. त्याकरीता विधी अधिकारी यांना सहाय्य करणेकरीता कायद्याचे ज्ञान असलेले तसेच शासकिय कामाचा, विशेषत: विधी कार्यालयात दावे/खटले हाताळण्यासाठी विधी सहाय्यक असणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्रमांक:- कडोंम-1020/प्र.क्र.3/नवि-28, व कडोंम-1019/प्र.क्र.139/नवि-28, दि.01 जून, 2021 रोजीच्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आकृतीबंध व सेवानियमाप्रमाणे तसेच शासन निर्णय क्रमांक:- नमुंम-1219/प्र.क्र.137/नवि-28, दि. 30 मार्च, 2021 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे, शासन निर्णय क्रमांक:- पमपा-2218/प्र.क्र.322(अ)/नवि-23, दि.16 मार्च, 2021 रोजीच्या पनवेल महानगरपालिका आकृतीबंधाप्रमाणे मुख्य विधी अधिकारी (वर्ग-01) (S-20 56100-177500) 01 पद तसेच 02 सहाय्यक विधी अधिकारी (वर्ग-03) (S-14 38600-122800) 02 पदे अशी एकुण 03 नवीन पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्याअनुशंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विधी विभागासाठी खालीलप्रमाणे पदे आवश्यक आहेत. त्यानुसार दि.27/1/2022, दि. 04/02/2022 व दि. 04/7/2022 रोजी प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरीता पाठविण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | पदनाम | सद्यस्थितीत मंजूर पदे | आवश्यक नविन पदे |
|---|---|---|---|
| 1. | मुख्य विधी अधिकारी | 0 | 1 |
| 2. | सहाय्यक विधी अधिकारी | 0 | 2 |
| एकुण | | 0 | 3 |

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरदेखिल उपरोक्त 03 नवनिर्मित पदे उपलब्ध करणेकरीता तसेच सदर पदांकरीता कल्याण डोंबिवली महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिकेकरीता मंजूर झालेल्या सेवा प्रवेश नियमाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा प्रवेश नियमात आवश्यक बदल करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 51 व 457(3) नुसार सदरच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

11/11/2022
प्रशासकीय पत्र 120 2022/23 दि. 12-07-22

11/11/2022

मारुती गायकवाड
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
सामान्य प्रशासन विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकिय सभा दि.१४/११/2022

**प्रकरण क्र.** ११३

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विधी विभागासाठी 01 मुख्य विधी अधिकारी (वर्ग-01) व 02 सहाय्यक विधी अधिकारी (वर्ग-03) या पदांच्या नवीन पदनिर्मितीचा व सेवा प्रवेश नियमामध्ये आवश्यक बदल करणेच्या प्रस्तावाबाबत.

**ठराव क्र.** ११२

### कार्यालयीन प्रस्ताव

शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. सदर आकृतीबंधामध्ये विधी विभागासाठी "मुख्य विधी अधिकारी"- (वर्ग-01) व "सहाय्यक विधी अधिकारी"- (वर्ग-03) हे पद मंजूर नाही. सदर आकृतीबंधामध्ये विधी अधिकारी (वर्ग-02) हे पद मंजूर आहे. सन 2006 साली "विधी अधिकारी" हे पद नामनिर्देशनाने/सरळसेवेने भरलेले आहे. विधी अधिकारी हे पद भरुन 15 वर्षे झालेली आहे. परंतु दि. 26/02/2019 रोजी मंजूर झालेल्या आकृतीबंधामध्ये मुख्य विधी अधिकारी हे पद मंजूर नसल्याने सद्यस्थितीत कार्यरत विधी अधिकारी या पदासाठी पदोन्नतीस कोणतीही संधी उपलब्ध नाही. त्यामुळे 01 मुख्य विधी अधिकारी (वर्ग-01) व 02 सहाय्यक विधी अधिकारी (वर्ग-03) या पदांची आवश्यकता आहे.

दि. 26/02/2019 रोजीच्या शासन निर्णयातील अ.क्र. 6 (3) मध्ये महानगरपालिकेची स्थानिक परिस्थिती व कामाची निकड विचारात घेता, या शासन निर्णयानुसार मंजूर केलेल्या पदांव्यतिरिक्त अधिकची पदे निर्माण करणे आवश्यक आहे, असे महानगरपालिकेचे स्पष्ट मत झाल्यास व महानगरपालिकेचा आस्थापना खर्च विहित टक्केवारीच्या मर्यादेत असल्यास नवीन पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनास सादर करता येईल, असे नमुद आहे.

विधी विभागातील विधी अधिकारी हे एकच पद मंजूर असल्यामुळे विधी अधिकारी यांना सहाय्य करण्याकरीता विधी सहाय्यक हे पद मंजूर होणे आवश्यक आहे. विधी विभागात महानगरपालिकेविरुद्ध मा. न्यायालयात दाखल होणाऱ्या दावे/याचिकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेविरुद्ध एकुण 4000 दावे/याचिका दाखल आहेत. सदर न्यायप्रविष्ठ प्रकरणांमध्ये महानगरपालिका पॅनेलवरील अभियोक्ते तसेच संबंधित विभाग प्रमुख, प्रभाग अधिकारी यांच्याशी समन्वय साधून माहिती उपलब्ध करून देणे तसेच मुदतीत मनपाच्या वतीने लेखी कथन/शपथपत्र दाखल करणे आवश्यक असते. तसेच शहरातील अनधिकृत बांधकामांबाबत दाखल होणाऱ्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांमध्ये महानगरपालिकेच्या बाजूने निर्णय लागणेकरीता बांधकामांस योग्य कायदेशिर नोटीसा देऊन कार्यवाही करणे आवश्यक असते

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

मिरा भाईंदर महानगरपालिका

त्याकरीता सर्व प्रभाग अधिकारी यांना विविध नोटीसांचा मसुदा तयार करून द्यावा लागत आहे. त्याकरीता विधी अधिकारी यांना सहाय्य करणेकरीता विधी सहाय्यक असणे आवश्यक आहे. कार्यालयीन कामकाज करीत असताना बहुतांश विभागांना कायदेशिर अडचणी निर्माण होत असतात अशा वेळी विधी विभागाचे कायदेशिर अभिप्राय विभागांमार्फत मागविले जात आहेत. परंतु विधी विभागात कायद्याचे ज्ञान असलेले कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे सर्व प्रकरणांमध्ये स्वत: विधी अधिकारी यांना कायदेशिर बाबींचा सखोल अभ्यास करून वेळेत अभिप्राय द्यावा लागत आहे. त्यामुळे विधी अधिकारी यांच्यावर मोठया प्रमाणात कामाचा व्याप वाढत चालला आहे. त्याकरीता विधी अधिकारी यांना सहाय्य करणेकरीता कायद्याचे ज्ञान असलेले तसेच शासकिय कामाचा, विशेषत: विधी कार्यालयात दावे/खटले हाताळण्यासाठी विधी सहाय्यक असणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्रमांक:- कडोंम-1020/प्र.क्र.3/नवि-28, व कडोंम-1019/प्र.क्र.139/नवि-28, दि.01 जून, 2021 रोजीच्या कल्याण-डोंबीवली महानगरपालिका आकृतीबंध व सेवानियामाप्रमाणे तसेच शासन निर्णय क्रमांक:- नमुंम-1219/प्र.क्र.137/नवि-28, दि. 30 मार्च, 2021 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे, शासन निर्णय क्रमांक:- पमपा-2218/प्र.क्र.322(अ)/नवि-23, दि.16 मार्च, 2021 रोजीच्या पनवेल महानगरपालिका आकृतीबंधाप्रमाणे मुख्य विधी अधिकारी (वर्ग-01) (S-20 56100-177500) 01 पद तसेच 02 सहाय्यक विधी अधिकारी (वर्ग-03) (S-14 38600-122800) 02 पदे अशी एकुण 03 नवीन पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्याअनुशंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विधी विभागासाठी खालीलप्रमाणे पदे आवश्यक आहेत.

| अ.क्र. | पदनाम | सद्यस्थितीत मंजूर पदे | आवश्यक नविन पदे |
|---|---|---|---|
| 1. | मुख्य विधी अधिकारी | 0 | 1 |
| 2. | सहाय्यक विधी अधिकारी | 0 | 2 |
| | एकुण | 0 | 3 |

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरदेखिल उपरोक्त 03 नवनिर्मित पदे उपलब्ध करणेकरीता तसेच सदर पदांकरीता कल्याण डोंबिवली महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिकेकरीता मंजूर झालेल्या सेवा प्रवेश नियमाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियमाप्रमाणे आवश्यक बदल करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 51 व 457(3) नुसार सदरचा प्रस्तावास मा. प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस विनंती आहे, असा कार्यालयीन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ११२ दिनांक. १४/११ /2022

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विधी विभागासाठी 01 मुख्य विधी अधिकारी (वर्ग-01) व 02 सहाय्यक विधी अधिकारी (वर्ग-03) या पदांच्या नवीन पदनिर्मितीचा व महानगरपालिकेच्या मंजूर सेवा नियमात आवश्यक बदल करणेबाबतचा दि.27/1/2022, दि.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जन माहिती अधिकारी
... विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

04/02/2022 व दि. 04/7/2022 रोजी प्रस्ताव शासनाकडे मंजूरीकरीता पाठविण्यात आलेला आहे. त्याचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क.71(भाग-2)/नवि-14, दि.27/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विधी विभागासाठी कल्याण-डोंबीवली महानगरपालिका, नवि मुंबई महानगरपालिका प्रमाणे मुख्य विधी अधिकारी (वर्ग-01) (S-20 56100-177500) 01 पद तसेच सहाय्यक विधी अधिकारी (वर्ग-03) (S-14 38600-122800) 02 पदे अशी एकुण 03 या पदांची नवीन पदनिर्मिती करणेस व महानगरपालिकेच्या मंजूर सेवा नियमामध्ये प्रस्तावित केल्यानुसार आवश्यक बदल करणेस मान्यता देण्यात येत आहे.

संबंधित विभागाने पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

Provided that the Commissioner shall inform the Corporation of the powers and duties which he from time to time deputes to a Deputy Municipal Commissioner or Assistant Municipal Commissioner.

(2) All acts and things peformed and done by a Deputy Municipal Commissioner or Assistant Municipal Commissioner during his tenure of office and by virtue thereof shall for all purposes be deemed to have been performed and done by the Commissioner.

**Conditions of service of statutory officers of Corporation.**

**50.** (*1*) The Transport Manager and all officers appointed under section 45 shall, subject to the provisions of sub-section (*2*), devote their whole time and attention to the duties of their respective offices and shall not engage in any other profession, trade or business whatsoever.

(*2*) The Corporation may, subject to the regulations, permit the Transport Manager or any other officer referred to in sub-section (*1*) to perform while on duty or during leave a specified sevice or series of services for a private person or body or for a public body, including a local authority or for the Government and to receive remuneration therefor.

(*3*) The Transport Manager or any other officer referred to in sub-section (*1*) shall be removable at any time from office for misconduct or for neglect of, or incapacity for, the duties of his office on the votes of not less than one half of the whole number of councillers.

(*4*) In all matters not otherwise provided for in this Act, the conditions of service of the Transport Manager and other officers specified in sub-section (*1*) shall be regulated by the regulations.

*Other Officers and Servants.*

**Number, designations, grades, etc. of other municipal officers and servants.**

**51.** (*1*) Subject to the provisions of sub-section (*4*), the Standing Committee shall from time to time determine the number, designations, grades, salaries, fees and allowances of auditors, assistant auditors, officers, clerks and servants to be immediately subordinate to the Municipal Chief Auditor and the Municipal Secretary respectively.

(*2*) The Commissioner shall, from time to time, prepare and bring before the Standing Committee a statement setting forth the number, designations and grades of the other officers and servants who should in his opinion be maintained, and the amount and nature of the salaries, fees and allowances which he proposes should be paid to each.

(*3*) The Standing Committee shall, subject to the provisions of sub-section (*4*), sanction such statement either as it stands or subject to such modifications as it deems expedient.

[1][(*4*) No new posts of the officers and servants of the Corporation shall be created without the prior sanction of the State Government:

Provided that, the decision of the Government on a proposal complete in all respects, received from the Corporation for creation of posts shall be communicated to the Corporation within ninety days from the date of the receipt of such proposal by the Government.]

---

[1] Sub-section (*4*) was substituted by Mah. 32 of 2011, s. 21 (*a*).

(5) Nothing in this section shall be construed as affecting the right of the Corporation or of the Commissioner to make any temporary appointment which it or he is empowered to make under section 53.

[1][*Explanation.*—Any revision of pay scale or pay structure or grant of special pay, or grade, or revision of allowances (excluding dearness allowance) or change in designation shall be deemed, for the purposes of sub-section (4), to be the creation of a new post.]

Restriction on employment of permanent officers and servants.

**52.** No permanent officer or servant shall be entertained in any department of the municipal administration unless he has been appointed under section 40 or 45, or his office and emoluments are covered by sub-section (1) of section 51 or are included in the statement sanctioned under sub-section (3) of section 51 and for the time being in force.

Power of appointment in whom to vest.

**53.** (1) The power of appointing municipal officers, whether temporary or permanent, [2][to the posts equivalent to or higher in rank than the post of the Assistant Municipal Commissioner] shall vest in the Corporation:

Provided that temporary appointments for loan works [3][to the posts equivalent to or higher in rank than the post of the Assistant Municipal Commissioner] may be made for a period of not more than six months by the Commissioner with the previous sanction of the Standing Committee on condition that every such appointment shall forthwith be reported by the Commissioner to the Corporation and no such appointment shall be renewed on the expiry of the said period of six months without the previous sanction of the Corporation.

(2) Save as otherwise provided in sub-section (1), the power of appointing municipal officers and servants, whether temporary or permanent, under the immediate control of the Municipal Chief Auditor and the Municipal Secretary shall vest in the Municipal Chief Auditor or the Municipal Secretary, as the case may be, subject, in either case, to the approval of the Standing Committee unless the said Committee in any particular case or class of cases dispenses with this requirement.

(3) Save as otherwise provided in this Act, the power of appointing municipal officers and servants whether permanent or temporary vests in the Commissioner:

Provided that such power in respect of permanent appointments shall be subject to the statement for the time being in force prepared and sanctioned under section 51 :

Provided further that no temporary appointment shall be made by the Commissioner for any period exceeding six months and no such appointment [4][carrying a salary equivlent to higher in rank than the

---

1. *Explanation* was substituted, by Mah. 32 of 2011, s. 21 (*b*).
2. These words were substituted for the words " whose minimum monthly salary exclusive of allowances is or exceeds four hundred rupees ", *ibid.*, s. 22 (*a*) (*i*).
3. These words were substituted for the words " carrying a monthly salary of rupees four hundred or more exclusive of allowaness", *ibid.*, s. 22 (*a*) (*ii*).
4. These words were substituted for the words "carrying a monthly salary of more than one hundred rupees exclusive of allowaness", *ibid.* s. 22 (*b*).

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मुख्य विधी अधिकारी (वर्ग-१) १ पद व सहायक विधी अधिकारी (वर्ग-३) २ पदे, अशी एकूण ३ पदे नव्याने निर्माण करण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५१(४) नुसार मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- मिभाम-११२२/सं.क्र.२५३/प्र. क्र. ७०/नवि-२८**
४ था मजला, मंत्रालय (मुख्य इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ०२ फेब्रुवारी, २०२३.

**संदर्भ:-**१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. १११६/प्र.क्र.३६(भाग-१)/१६/नवि-२८, दि.२६.०२.२०१९.
२)आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे पत्र क्र. मिभा/मनपा/आस्था/ ३३०२/ २०२१-२२, दि. ०४.०२.२०२२.
३) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे पत्र क्र. मनपा/आस्था/७५२/२०२२-२३, दि.०४.०७.२०२२.
४) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे पत्र क्र. मिभा/मनपा/आस्था/१५८५/ २०२२-२३, दि.१७.११.२०२२.
५) मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा प्रशासकीय ठराव क्र. ११२, दि.१४.११.२०२२.

**प्रस्तावना:-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील विभांगाकरीता विविध संवर्गातील एकूण २५६१ पदांच्या आकृतीबंधास दि.२६.०२.२०१९ शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आकृतीबंधामध्ये विधी विभागसाठी 'मुख्य विधी अधिकारी' (वर्ग-१) व -सहायक विधी अधिकारी' (वर्ग-३) ही पदे मंजूर करण्यात आलेली नाहीत. सदर आकृतीबंधामध्ये 'विधी अधिकारी' (वर्ग-२) हे एकच पद मंजूर करण्यात आलेले आहे. सन २००६ मध्ये विधी अधिकारी हे पद नामनिर्देशनाने/सरळसेवेने भरलेले आहे. 'विधी अधिकारी' हे पद भरती करून १५ वर्षे झालेली आहेत. परंतु, दि.२६.०२.२०१९ च्या आकृतीबंधामध्ये 'मुख्य विधी अधिकारी' हे पद मंजूर नसल्याने, सद्यस्थितीत कार्यरत 'विधी अधिकारी' या पदासाठी पदोन्नतीस संधी उपलब्ध नाही. तसेच, मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील विधी विभागातील वाढलेले काम पाहता, 'मुख्य विधी अधिकारी' (वर्ग-१) १ पद व 'सहायक विधी अधिकारी' (वर्ग-३) २ पदे, अशी एकूण ३ पदे नव्याने निर्माण करणे आवश्यक असल्याने, त्यासाठी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी संदर्भीय दि.०४.०२.२०२२ व दि.०४.०७.२०२२ च्या पत्रान्वये नवीन पदनिर्मितीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे.